## प्रकरण दुसरे

### 'मातीखालची माती'- या व्यक्तिचित्रसंग्रहाचा विचार

### समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण या संदर्भात

# प्रकरण दुसरे

## 'मातीखालची माती'- या व्यक्तिचित्रसंग्रहाचा विचार

## समाजाचे आणि व्यक्तिमनाचे चित्रण या संदर्भात

### प्रास्ताविक -

श्री·आनंद यादव यांचा 'मातीखालची माती' हा चौदा व्यक्ति-चित्रांचा संग्रह सप्टेंबर १९६५ मध्ये प्रकाशित झाला· 'मातीखालची माती' या शीर्षकासंबंधी अगदी सुरवातीलाच आलेल्या -

आई एकदा सहज म्हणाली,
" माती असली तरी
मातीखालची माती ओली आणि उबदार असते···
तिच्या उबीतच पिकं जीव धरतात·"

या वाक्यांचा अन्वयार्थ विचारात घ्यावा लागतो· " जशी या ओल्या आणि उबदार मातीतच पिकांची मूळं रुजलेली असतात· तशा स्वरूपानेच या मातीचा गंध, तिची धग आणि तिच्या पोटातला गारवाही यादवांच्या ग्रामीण साहित्यात भरून राहिला आहे· 'मातीखालची माती', 'मळ्याची माती' ही माती यादवांच्या साहित्यात बाहेरून उपरेपणाने आलेली नाही"[१] असा निर्वाळा अनुराधा पोतदार यांनी दिला आहे·

समाजजीवनाची कोणकोणती अंगे या व्यक्तिचित्रसंग्रहातून प्रकट होतात ते पाहू·

शेतीचे, शेतक-याचे चित्रण -

प्रथमत: हया व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये विविध शेतकामाचे व ते करणा-या शेतक-याचे चित्रण यादवांनी कसे केले आहे, ते पाहू.

'शिवा', 'लंगडा गोपा' यांना स्वत:च्या मालकीची जमीन आहे. शिवा हा बागाईतदार आहे तर जिराईत शेती गोपा करतो आहे. शिवाला खूप कामं करावी लागतात. उसाला पाणी पाजणे, धावेला पाणी घालणे, बैलाना पाणी पाजणे, उसातली वैरण काढणे, (पाला काढणे), गंजीतून कडबा काढून तोडून ठेवणे आणि शेवटी सांजवेळी घराकडं परतताना दुभत्या म्हैशीची वैरण डोक्यावरून आणावी लागणं अशी विविध कामं करावी लागतात. (पृ.१३)

शिवाच्याच वयाचा 'दिन्या' चांदणी उगवायला उठून कामाला लागतो. जनावरांचं शेण काढणे, त्यांना पाणी पाजणे, वैरण करणे, उसात भांगलणी, खत देणे अशी कामे चालू असतात (पृ.१२३) उलट वाढत्या वयातील ही मुलं अशी कामं करताना दिसतात. या उलट उताराकडे झुकलेली माणसं शेवटी शेतात पाण्याची दारं मोडू लागतात. या विशिष्ट वयोगटामध्ये 'चव्हाणाचा आबामा' आणि 'गडी म्हादूमा' यांचा समावेश होतो. कंत्राटानं कामं करणारा, जिवाला राजावाणी असणारा आबामा गुऱ्हाळात गुळव्याचं काम करायचा. इतरापेक्षा जास्त मजुरी मिळवायचा (पृ.२०) अशा स्वरूपाची आणखीन काही पात्रे आपण पाहू. गडी म्हादूमा तसा इरसाल कामचुकार माणूस आहे. शेतात पाणी पाजताना पाटातला तुंब, कातरा कधीच काढत नसे. आंबिलीगत चिखल करून दारं बांधलेली असत. कधी दारंच वाहून जायची तर कधी पाजलेल्या चिऱ्यालाच पुन्हा पाणी जायचं. (पृ. ६०) त्याच्या वर्तणुकीतूनच त्याचा स्वभाव समजण्याची शक्यता आहे. हा म्हादूमा टाप-टीप नाही. त्याचा गबाळेपणाच त्याला नाडतो. मोडकी अवजारं आणि केवळ कातडं सांभाळून असणारी बैलं घेऊन

दतू भाडं करतो (पृ·१०९) ग्रामीण भागामध्ये असाही ओढाताणीने कटकटीने ग्रासलेला एखादा शेतकरी किंवा शेतक-यांच्या सहवासात असणारा एखादा भाडेकरू असतो ही विविधता दिसून येते·

गोपाचा एक पाय खारकेसारखा वाळला आहे· त्या पायानं तो लंगडत चालतो तरीही शेतीच्या बैठ्या कामाला इतर कोणाही धडशा माणसाहूनही तो सरस आहे· खुरपणी, मांगळणी करणे, जळणाची गंजी, वैरणीची बडीम रचण्यात त्याच्यासारखा त्याच्याइतका दुसरा कोणी तरबेज नाही· कापसाच्या पळकाट्या उपटण्याचे काम तो खंडून घेतो· (१७४-१७५) आपल्याला पेलवणारे कष्ट किती आणि कोणत्या स्वरूपाचे आहे याचा यथायोग्य विचार करून वागणारा गोपा सरळमार्गी माणसाचे प्रतीक आहे· 'बाबजी बल्लाळ' सभोवारच्या जीवसृष्टीशी एकरूप झाला आहे· खंडानं केलेल्या शेतातही घोडं-खोपीपुढं आंब्याची दोन रोप लावतो· शेतीशी-शेतकामाशी तो भावनिक पातळीवर एकरूप झाला आहे· (पृ·९०)

खाण्या-पिण्याबाबतीत प्रसिद्द असलेला 'धोंडबा' गु-हाळात फडकरी म्हणून काम करतो· शेतीच्या या हंगामी कामामध्ये त्याला खूपच रस आहे· (पृ· १५२) 'इठू धनगर' मेंढरांचा बगा घेऊन रानोमाळ भटकतो· वावरातली सारी शेती त्याला माहित आहे· (पृ· १५८)

'आक्कू मावशी' पेरणीच्या टिपणाला शेंगांचं बी काढण्यासाठी शेतक-याच्या घरात असायची· बाळ भांगळणी, गुड मोडणी, शेंग काढणी वगैरे कामाला ही हमखास असायची (पृ·४५) शेतीच्या कामामध्ये स्त्रियांचा-ही काही सहभाग कोणत्या स्वरूपाने आणि कितपत असू शकतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे·

'शिवा' आणि 'दिन्या' ही पोरसवदा आहेत· वाढत्या वयातील या मुलांना काहीतरी भवितव्य आहे· कामाची अधिकता आणि वेळेचा

अपूरेपणा यांच्या कोंडीत काहीवेळा शिवा खूपच चिडतो. इतरांवर रागावतोसुध्दा. पण दिन्या पोरका असल्याने कोणावरही रागावू शकत नाही. गडी म्हादूमा केवळ पोटासाठी चाकरी राहतो. चव्हाणाचा आबामा उतारवयात चाकरी राहतो. हे दोन्ही शेतगडी शेतीची कामे व्यवस्थित करण्याऐवजी मालकालाच खूप जड झाले आहेत.

लंगडा गोपा आणि बाबजी बल्लाळ हे तसे सुखी आणि समाधानी मानावे लागतात. आपणापासून इतरानां त्रास होऊ नये ही त्यांची भूमिका विशेष आहे. शेताशी प्रामाणिकपणाने वागतात म्हणूनच ते भाजी-भाकरी समाधानाने खात आहेत.

'दत्तू' आणि 'बापू' ही दोन पात्रे प्रत्येक घटनेशी बेईमानाने वागतात. जिथे जिथे जातील तेथेच चोरी करतील. अशी त्यांची अवस्था आहे.

<u>हंगामानुसार शेतीची कामे -</u>

उन्हाळा - पावसाळा - हिवाळा या ऋतुचक्रानुसार शेतीची कामे कमी - जास्त होतात. उन्हाळ्यामध्ये शेतीची मशागतीची कामे करावी लागतात. खत ओढणे, नांगरणी, औत करणे यासारखी कामे चाललेली असतात. गोपा उन्हाळ्यामध्ये शेतातला कुंदा खांडतो. दरदरून घाम फुटेपर्यन्त काम करतो नंतरच थांबतो. धोंडबा हा उन्हाळ्यामध्ये खोडव्याची ढेकळं फोडतो, सारणी (बांध) घालतो. ही उन्हाळ्यातील कामे संपतात न संपतात एवढयात पावसाळी कामे सुरू होतात.

शेतक-याच्या जीवनात पावसाळ्याला खूप महत्त्व आहे. पेरणी विरळणी - बाळभांगलणी - गुड मोडणी - या सारखी विविध कामं या कालावधीत चालतात. आक्कू मावशी ऊस भांगलणीला आणि ज्वारीला बाळ - भांगलणीला जाते. सगीत गुड मोडणीला जाते आणि शेवटी ही सर्वच कामे संपल्यावर शेतातील वाव-या शेंगा शोधायला जाते.

गुऱ्हाळाचा हंगाम बहुधा हिवाळ्यात येतो. तेव्हा चव्हाणाचा आबामा गुळवेपणा करतो. तर लंगडा गोपा चूल मारायचं काम करतो. तर याच वेळी ताकतवान धोंडबा फडकरी म्हणून काम करतो. शरीर बळाला साजेसे पेलेल, असेच काम त्याने पत्करले आहे.

शिवा-दिन्या ही मुलं आणि आबामा आणि म्हादूमा ही म्हातारी माणसं सदैव वैरण-पाणी-शेण वगैरे जनावरांची खुशालवारी करण्यातच गुंतलेली आहेत. मोटचं पाणी पाजण्यातच यांचा बराचसा काळ संपतो.

ग्रामीण भागात शेती हाच मुख्य व्यवसाय आहे. शेती ही निसर्गावरच अवलंबून आहे. म्हणून त्यापद्धतीने कामांची योजना करावी लागते. विविध स्वरूपाच्या कामामध्ये माणसं गुंतलेली असतात. या सा-यांचे चित्रण या संग्रहात येते. ग्रामीण मनुष्य कोणती कामे करीत जगतो हे वाचकांच्या प्रत्ययाला येते.

भयानक दारिद्र्याचे चित्रण -

'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रसंग्रहातील बहुतेक माणसं दरिद्री आहेत. गरीबी ही जणू त्यांच्या पाचवीलाच पुजलेली आहे. चोरी करणे हा त्यांचा जन्मजात गुणधर्म आहे, असे वाटण्याइतपत चोरी त्यांच्या अंगवळणी पडली आहे. चोरी करण्याबाबतची सर्वच्या सर्व पारितोषिके एकाच बापू मांगाला द्यावी लागतील इतका तो चोरीच्या कामात पारंगत आहे. दारिद्र्याची जीवश्रेणी रूपे पहावयास मिळतात. ती आबामा आणि म्हादूमा यांच्या संदर्भातली. खाण्यासाठीच ही दोन पात्रे जन्माला आल्यासारखी वाटतात.

शेती हा व्यवसाय निसर्गावरच अवलंबून आहे. पाऊस वेळेवर झाला की शेती नीट पिकते, अन्यथा पिकं व्यवस्थित येत नाहीत. उत्पादन आणि परिणामी आर्थिक परिस्थिती खालावते.

अनेकदा पाऊस पडूनही उत्पादनाची निश्चिती नाही, पिकाचा भरवसा नाही, अतिवृष्टी, अवर्षण, धुकं, चिकटया रोग, मावा, तुडतुडे अशा वेगवेगळ्या अनेक घटकांवर शेती उत्पन्न ठरत असते. म्हणजेच उत्पन्नाची निश्चिती नाही अशी त्यांची अवस्था होते. शेती हाच मुख्य व्यवसाय असल्याने तदनुषंगिक चालणारे बाकीचे सारे व्यावसायिक कुचंबतात. सुतार लोहार, चांभार, सोनार यांचे व्यवसायही तसे मंदावतातच. भाडेकरु दत्तू खूपच गरीब आहे. काखवाव लांबीचं तीन तुकडं जोडून तो पटका बांधतो. मोट हाणताना आगडीवर बसून बसून कमरेची पंजी ढुंगणावर फाटलेली असते. शेतीची अवजारं ठीक नाहीत. सारी मोडकीच आहेत. बैलगाडी सुध्दा ठीक नाही. चाकाची धाव हलते, दांडी पिचलेली आहे. बैलानां चारा नाही, वेसण नाही अशी अवस्था आहे. हाडाच्या सांगाड्यावर कातडी पांघरलेली असावी असे दिसणारा बैल मेल्यावर, मांग बैलाला नेतात. तेव्हा 'कातड्यातलं निम्म पैसं मला द्यायला पायजेत गा.' असे म्हणतो (पृ.११७) दारिद्र्याचे विदारक चित्रण येते. आर्थिक परिस्थितीने कुचंबलेला माणूस हरघटनेतून पैशाची अपेक्षा करीत असतो. आर्थिक बळ नसले की बहुधा मनुष्य लाचार होतो, चोरी करतो. गोपाची मानसिक स्थिती तशीच झाली आहे. दारिद्र्याची व्यथा त्याला सातत्याने पिडते.

समाज जीवनाच्या प्राथमिक गरजाही भागविणे अतिशय कठीण वाटत असते. अन्न-वस्त्र आणि निवारा या मूलभूत गरजा असल्या तरीही अन्नाची गरज ही अती महत्त्वाची बाब आहे. भूक ही न संपणारी आहे. सातत्याने चालणाऱ्या या भुकेत कोणीच खंड पाडू शकत नाही. या विदारकतेचे चित्रण आनंद यादव यांनी खूप सूक्ष्मतेने केलेले आहे.

गोपा मांग लंगडा आहे. त्याला दीड वर्षाचं एक नाळरोगी पोरगं होतं. गेले दोन दिवस झालं पोटात अन्नाचा कण नाही अशावेळी गोपा एक खायाया उसणा मागतो. निदान कण्या भरडून खाण्यासाठी

त्याला पैसे हवे असतात. शेवटी तुळईला टांगलेल्या म क्याच्या वियांच्या कणसांच्या माळ्यातून पाच-सहा कणसं काढून दिली. पुढे चार-पाच दिवसानंतर निवेदक (मालक-मी) मांगवाड्यात जातो तेव्हा मी गोपाला त्याच्या पोराच्या प्रकृतीविषयी विचारतो. गोपा उत्तर देतो, ' पॉर मेलं मालक, परवादिवशीच. तुम्ही दिलेल्या मक्क्याच्या कण्या त्येनं हूं म्हणून भूकच्या पोटी खाल्ल्या नि मक्कं पोटात फुगून पॉट बोदागत झालं कसंबसं मग एक दीस जगलं ' (पृ. १८२) पोराच्या मृत्यूनंतर अवघ्या तीन दिवसानी तंबाखू खुरपणीच्या कामावर जाण्याची पाळी येते. ' पोटाच्या पाठी लागून ते मेलं आम्हीबी असंच एक दीस माती आड व्हायचं पॉट पॉट करत! ' (पृ.१८२) फाळक्याच्या गु-हाळात चुलाणातली राख काढून हाऱ्यातून नेताना पाय लवकून पडतो. आठधा दिसांची पोटगी तो उरवून उरवून महिनाभर खातो (पृ. १७८) किंवा शेतकामाला गेल्यावर चटणीच्या बुकण्याबरोबर भाकरी खातो. कधी कवळं कांदं किंवा कांद्याची पाती घेऊन भाकरी संपवतो (पृ. १७२) सर्वदु:खाचे मूळ कारण भूकच आहे हे स्पष्ट होते. म्हादूमा आबामा,आक्कू मावशी ही माणसं भूकेनं गांजलेली आहेत. धिप्पाड अंगाची सदैव जुणेरात वावरणारी आक्कू मावशी भूकेनं गांजलेली आहे. अंगावरले वस्त्र (जुणेर) इतके अपुरे आहे की परमेश्वरानं लाज दिली नसती तर बरं झालं असतं असं वाटतं. आडदाणीवर फा क्या वाकला, तडे गेलेल्या गाडग्यांची कोप-यात उतरंड हे तिच्या दारिद्र्याचे दर्शकच आहेत. छोटया अनसूयेला ताप आला होता म्हणून आईनं ताईबाईला बोलून घेतलं होतं. बेंदरादिवशी तिच्या परड्यातल्या ताईबाईला थाळ्यातून निवद दिला जातो. अनसूयेच्या तापावर उतारा म्हणून उरफाटया पक्काचं कोंबडं, निवद,पोळ्या, अंडी एवढं साहित्य दिलं जातं. नारळ फोडून मागं फिरलो तर तेवढयात संधी साधून आक्कू मावशीनं जुणेराच्या ओटयात पोळ्या आणि अंडं घेतलं होतं.येशेल तेलाचं ठावकं विझविलं होतं आणि पूर्वीच्या ठावक्याच्या मिणमिणत्या उजेडात आक्कू मावशी कोंबडीचं पिल्लू धरण्याची धडपड करीत

होती. (पृ. ५१) भूक ही जीवनव्यापी आहे. भूक भागविण्यासाठी ती उतारा घ्यायला सुध्दा मागे-पुढे पहात नाही.

चव्हाणाचा आबामा उतारवयामध्ये चाकरी राहतो. पोटासाठी शेतभेंड्या, चवळीच्या शेंगा, पाडाचं टाम्याटो, आवळ - चावल चावून खायचा. मक्याची कंदं, कै-या खायचाचं,भाकरी आणि कण्या ओरबडण्यात खंड नव्हता.(पृ. २३) खाणे-पिणे याशिवाय त्याला दुसरी गोष्ट कोणतीच सुचत नाही.

खुशालचेंडू म्हातारा गडी म्हादूमा 'पोटावारी -हातो' म्हणून कबूल करतो आणि राहतो सुध्दा. दिवसातून दोन वेळा परोळभरून ताककण्या वरपतो, गूळ आणि मीठ घालून चहा करून पितो. पान खाणे, चहा करून पिणे यातच दिवस घालवितो. काम तर करतच नाही. काटंवाळकं, भेंड्या खातो. (पृ. ५६) केवळ त्याला लागणारं अन्न सुध्दा त्याच्या कामातून मिळत नसे. पोटासाठी तो लाचार आहे. केवळ पोटावारी सुध्दा हा गडी न परवडणारा आहे. त्याची भूकच तेवढी बळकट आहे. तेरा-चौदा वर्षाचा शिवा काडीपैलवान आहे. शेतकामातच सदैव गुंतलेला शिवा पोटात भुकेची आग सांभाळून आहे. चेंबलभर चहा घेऊन त्याबरोबर पाव खाल्ल्यागत भाकरी खायची त्याला सवय आहे. जास्त चहा आणि भाकरी हवी असते. भाकरी न देणा-या बहिण धोंडूबाईवर तो चिडतो. तिला "कोल्हूबा' म्हणतो. चहासाठी तिच्या पाठीत धपाटे मारतो. रात्री झोपी जाण्यापूर्वी "खूपच भात वाढ" म्हणून आईशी भांडण काढतो. कोकणात नोकरीला असलेल्या आपल्या मोठ्या भावाला शिवा म्हणतो, 'दादा, कोकणात चाललाईस... येताना चार-पाच पोती भात तरी आण मोटारीच्या टपावर टाकून !" (पृ.१३)

बापू मांग चोरी करतो आणि चोरी का केली याचं समर्थनही करतो. पोटालाबी काय न्हवतं... काय करतोस ! जगलं तरी पाहिजे. हे पोट

गप बसू देतंय व्हय ?") (पृ.३९) या प्रश्नाच्या बुडाशी भुकेचाच फार मोठा प्रश्न आहे. भूक ही बलवत्तर आहे.

दिन्याला त्याच्या आईकडे म्हणजे मंजाकडे पाठविले जाते. मंजाच्या आग्रहानेच तशी पाठवणी होते. पण आठ-दहा दिवसातच दिन्या मागे आमच्या घरी परत येतो. सकाळपासून त्याने जेवण ही केलेले नसते. गावाहून आल्याबरोबरच ताट-वाटी घेऊन जेवायला बसतो. (पृ.१३१) भाडेकरू दत्तू हा 'भगाट ओपन डिस' घरात राहतो. बैलांना चारा नाही, त्याला व्यवस्थित कपडे नाहीत, कपड्यांची लक्तरं झाली आहेत. जनावरं बांधण्यासाठी जागा नाही म्हणूनच त्याच्या जीवनाला एक प्रकारची लाचारी आली आहे. ज्या बैलांच्या जिवावर त्याची गुजराण चालू आहे त्या जनावरांनाही तो व्यवस्थित सांभाळू शकत नाही. म्हणूनच माणसांची भूक आणि जनावराची भूक ही समांतर रेषेतून चित्रित केली आहे. (पृ.११०)

"ही सारी व्यक्तिचित्रे वाचल्यानंतर आपल्यावर परिणाम होतो तो जीवनातील भकास पोकळीचा. ही माणसे जगत असतात कमालीचे दारिद्र्य अनुभवीत, जीवापाड कष्ट करीत, अगतिकपणे, लाचारपणे जगत असतात. हे जगणे प्राथमिक पातळीवरचे आहे. का जगायचे ? असा प्रश्न कोणापुढेच नाही. जगण्याच्या पलिकडे कोणतेही मूल्य नाही. जगण्यात कोणताही अर्थ नाही. अशा या निरुद्देश, अर्थशून्य जगण्यासाठी त्यांची जीवापाड धडपड सुरू असते म्हणून ती अधिकच भकास वाटू लागते."[२]

ही माणसे दारिद्र्याने पिचलेली आहेत. त्यामध्ये भाडेकरू दत्तू जास्तच खचला आहे. 'छापील बैल' काय आणि भूक शमविण्यासाठी धडपडणारा दत्तूमा आयुष्यातून आनंदच गमावून बसला आहे. आक्कू मावशी मरण येत नाही म्हणूनच ती जगते आहे. उतारा म्हणून टाकलेलं कोंबडीचं पिल्लू धरण्यात तिला काही गैर वाटत नाही. काहीतरी करून पोट भरणे अगत्याचे वाटते. पोट भरण्यासाठी सरळ रीतसर मार्ग संपले की माणूस

वाटेल तो मार्ग शोधू लागतो. केवळ पोटाची भूक भागविण्यासाठी माणसांना चोरी करावी लागते. याचे चित्रणही यादवांनी अनेक व्यक्तिचित्रात केले आहे.

चोरी -

'बापू मांग' आणि 'दत्तू भाडेकरू' ही माणसं चोरीशिवाय जगू शकत नाहीत. बापूच्या चोरीच्या व्यवसायाला पावसाळ्यात खरा ऊत येतो. तो पारितोषिक विजेता चोर आहे. कोणत्याही वेळेला, कोणत्याही तसरीला, कोणाच्याही शेतामध्ये शिरतो. माळवं, गवत चोरतो. चाऱ्याच्या भाऱ्यावर विशेष मर्जी असते. म्हणून त्याचीच चोरी करायची असेच जणू ठरलेलं असतं. उन्हाळ्याच्या दिवसात पोटाला काही मिळेना तेव्हा त्याने गवत कापणीची संधी साधून बिराप्पा धनगराच्या कोकराच्या नरड्याचा घाटा दाबून सौंदडीखाली पुरून ठेवला. आणि चोरी केल्याबद्दल समर्थन करतो. "उन्हाळ्याचं दीस कुठच हात सरकना. पोटालाबी काय न्हवतं ... काय करतोस ? जगलं तरी पाहिजे. हे पॉट गप बसू देतंय व्हय ?" (पृ.३९) चोरी केल्याशिवाय तो जगूच शकत नाही. बाबू गवंड्याला तो दम देतो. त्याला भिववितो. चोरीबद्दल कुणी डाफरलं तर विशिष्ट तारेत बोलतो. " अंऽऽ! काय खावं गा आम्ही मग ? आम्हांस्नी का इनामं हाईत व्हय, रयता हो ?" (पृ.३१) आपण गरीब आहोत म्हणूनच आपणाला चोरीचा अधिकार आहे, असे त्याचे म्हणणे आहे. चोरी करताना मुद्देमालासह सापडलाच तर त्या शेतमालकाला गुबगुबतो. " देवाबरचा पाऊस पडलाय, गोरगरीब जरा खाऊ द्यात की..." (पृ.३१)

भाडेकरू दत्तू वेळोवेळी रास्टान बदलतो. बैलासाठी म्हादबा कारदगेकराच्या येथे गवत-कडब्याची चोरी करतो. (पृ.१११) त्यात तो म्हादबाकडून मारही खातो. शंकरआण्णानं आपल्या इथली वैरण

दत्तूमाच्या बैलासाठी नेऊन टाकली. अशी त्याच्या आयुष्याची कुतरओढ चालू आहे.

आक्कू मावशीच्या दारात मुले फर्यांनी खेळत होती. गोपाळच्या पोराचरडाव येतो. बाकी पोरं मतामती करून त्याला लंगवतात. गोपाळाचं पोर भांडू लागतं. भांडण मिटवायचं निमित्त करून त्याच्या गळ्यातील सोन्याची पेटी घेते, पंचवीस रुपयाला विकते. पंचवीस पैकी सात रुपये खर्च करते (पृ. ४७) येथल्या लेखनामध्येही अशी स्पष्टता आहे. "पोटासाठी ती जगत होती. पोट मोठं लुबरं होतं." (पृ. ४५) जगणं ही-सुध्दा एक प्रकारची शिक्षाच झाली होती; असे वाटते.

भूक शमविण्यातच मोठेपणा मानणारा धोंडबा बायकोला चुकवून दूध प्यायचा ही त्याची चोरीच आहे. शंकरअण्णानं कणसं काढायचं नाकारलं तर दुसऱ्या दिवशी सकाळी हाराभर कणसं चोरीला गेलेली असायची. (पृ.१४७) राणूजीच्या शेतातली भुईमुगाची चोरी करायचा.(पृ.१४७) भूक भागविण्यासाठी चोरी करण्यात काही पाप आहे, असं त्याला वाटत नाही.

ही विविध परिसरातील माणसं एका चोरीच्या विशिष्ट धाग्याने समाजगुण दर्शवून जातात. दारिद्र्याचे मूळ भूक आहे. क्षुधाशांती करणे ही खूप मोठी अवघड बाब आहे. बापू मांगासारखा माणूस हा मगूर आहे. रयताकडे मागण्याचा हक्क आहे आणि नाही दिलं तर चोरीला वाव आहे. ही त्याची धारणा आहे. दत्तू तसा मगूर नाही. चोरी करतानाच बापू पकडला --- --- शेतकऱ्याला गुरगुरतो, तर दत्तूमा म्हादबा कारदगेकराकडून मार खातो. आक्कू मावशी चोरीचा गुन्हा कबूल करते. सात रुपये खर्चून उरलेले अठरा रुपये परत देते. आबामा कधीही खूप खोलवरचा विचार करत नाही. हे अन्न, काटं वाळकं, शेतभेंड्या पचतील किंवा नाही याचा विचार न करता मालकाला चुकवूनही (चोरून) सतत खातच राहतो. त्याचा अतिरेक होऊन, त्यामुळे हाग-वक होऊनच त्याचा मृत्यू झाला.

पोटासाठी लागणाऱ्या अन्नाची चोरी करणं याशिवाय दुसरा कोणताच हेतू नाही. फक्त पोट भरण्याशिवाय दुसरा विचार नाही. पोटासाठी चोरी करणं यात काहीच पाप नाही अशी बापू, धोंडबा, आक्कूमावशी, दत्तूमा यांची भूमिका दिसते.

धार्मिक - सामाजिक जीवनाचे चित्रण -

ग्रामीण जीवन हे धर्मविषयक कल्पना, श्रद्धा-अंधश्रद्धा, सामाजिक रूढी, नीतिकल्पना इत्यादींनी नियंत्रित झालेले असते. ग्रामीण समाजरचनेचे स्थैर्य टिकून राहण्यासाठी समाजात गरजेनुसार वरील बाबींसंबंधी कल्पना निर्माण झालेल्या असणार. ह्या सर्व बाबींमधून ग्रामीण समाजाची राहाटी प्रकट होते तसेच समाजमनही प्रकट होते. आनंद यादवांच्या 'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रणसंग्रहामधून धार्मिक-सामाजिक जीवनाचे चित्रण कितपत झाले आहे व त्यातून ग्रामीण समाजजीवन व समाजमन कितपत प्रकट झाले आहे ते पाहू.

एकंदरीतच धर्माचे मानवी जीवनातील स्थान व स्वभाववैशिष्टय सांगताना दुर्गा भागवत म्हणतात, " धर्म म्हणजे एक आदिम मार्ग असून त्या मार्गावरच समाजांना स्वत:बद्दलची व स्वत:च्या इतिहासाबद्दलची जाणीव उत्पन्न होते. व्यक्तीला संवेदना तशीच सामाजिक व्यवस्थेला धर्माची गरज असते."[3]

देवावरील श्रद्धेचा खरेखोटेपणा पडताळण्यासाठी माणसे कधी उपयोग तर कधी दुरुपयोग करतात. आक्कूमावशी गोपाळाच्या पोराच्या गळ्यातील सोन्याची पेटी चोरते. पोलीस अधिकाऱ्याकडून विचारणा झाल्यावर म्हणते, " देवाची आन, मी चोरी केली न्हाई. वाटलं तर दत्ताची पायरी आंधळं करून चढते." (पृ. ४५) आपल्या खरेपणासाठी, आपण प्रामाणिक आहोत दर्शविण्यासाठी तिने शपथ दिली. दत्ताच्या

देवळाची पायरी चढण्याचा विचार व्यक्त केला·

माणसाने नीतिमत्तेने-प्रामाणिकपणे वागायला हवे-असे मत व्यक्ती-च्या अंतरंगात खोल कुठेतरी लपलेले असते· मंजाचा नवरा येसू खुनाच्या आरोपातून तुरुंगात जातो· तेराचौदा वर्षांनी अचानक परत येतो· भैरु चिखल्याकडे राहणाऱ्या मंजाला येसूने परत नेले· पुन्हा सात-आठ वर्षांनी दिन्याला न्यायला मंजा-येसू येतात· तेव्हा मालकीणबाई मंजाला विचारतात, "पोरंबाळं किती ?" तेव्हा मंजा म्हणते, "कुठलं हो आक्का ! काय बी न्हायी··· माणसाचा जीव घेणाऱ्याच्या पोटाला पोर-बाळ कुठलं होईल ? " (पृ·१२७) ज्याचे अंतरंग शुद्ध, नीतिमत्ता शुद्ध त्याचे जीवन-ही शुद्ध अशी निर्मळ स्वरूपाची धारणा आहे· या श्रद्धेत एकप्रकारची पावित्र्याची अदृश्य जीवनधारा आहे· बापू मांगानं कोकराच्या नरड्याचा घाटा दाबून मारला आणि सौंदडीजवळ पुरून ठेवला· ही बाब दादांना कळली तेव्हा दादा म्हणाले, " ··· आयला, कुठं पाप फेडशील हे ?"(पृ·३९) पाप पुण्याची कल्पना ही श्रद्धेवरच अवलंबून आहे·

सखारामाच्या आईबाच्या सपनात यल्लूबाई आली, आणि तिनं पोरीचं नाव बापयाचं ठेव आणि माझ्या नावानं तिला सोड· म्हणून सांगिटलं· तवापासनं माझं नाव 'सखाराम' पडलयं (पृ·७५) स्वप्नात देव देवता येणे वगैरे गोष्टीवर श्रद्धा ठेवली जाते· दैवी स्वरूपाची शक्ती आपल्या ठिकाणी आहे असे भासविण्याचा प्रयत्न केला आहे· आबाच्या मृत्यूनंतर प्रेताला आंघोळ घातली जाते (पृ·२६) येथे या धर्मसंकेताची फारशी कोणी चिकित्सा करीत नाही पण आंघोळीचा विधी करण्यात येतो·

फुलाआत्ती सगळ्या गावची बाळंतपणं करते· सुईणीच्या हातगुणा-मुळे मुलगा किंवा मुलगी होते, अशीही एक श्रद्धा आहे· मांजरी व्याल्यावर की पिलांच्या संरक्षणासाठी ती सतरा ठिकाणं बदलत असते· अशी सवय दत्तूमाला आहे· तशा स्वरूपाचे उदाहरण दिल्याने एक प्रकारची सुस्पष्टता आली आहे·

नवसाने ईप्सित प्राप्त होते. अशी अनेकांची अंधश्रध्दा असते. नवस बोलण्याने अनसूयेचा ताप उतरला. ताईबाईची कृपा व्हावी म्हणून पोळ्या, भात, अंडी, उरफाटया पंक्काचं कोंबडं द्यावे लागते. तसा सौदा जुळविला गेला. (पृ.४७) माणसाच्या बुध्दीलाही काही मर्यादा आहेत. बु ध्दीच्या प लिकडच्या अदम्य-अतर्क्य घटनेवर विश्वास ठेवून, श्रध्दा ठेवून माणूस जगत असतो. फुलाआत्तीला साठ नवसानं 'भिकू' नावाचं सुंदर कल्याणी पोरगं झालं.(पृ.९४) नवसानं हवे ते मिळविता येते. अशी एक भाबडी श्रध्दा आहे. फुलाआत्तीच्या वडिलांच्या मृत्यूनंतर तीन महिन्यांनी सुनेला मुलगा झाला. तेव्हा ती म्हणाली, " --- माझा बाऽ माझ्या सुनंच्या पोटाला आलाय---....(पृ. १०३) पूर्वजन्म आणि पुर्नजन्म यावरील विश्वासापोटी अशी तिची विचारसरणी पक्की झाली आहे.

धर्माची उच्चतर कल्पना 'बाबजी बल्लाळ' या व्यक्तिचित्रातून प्रकट होते. बाबजीनं खंडानं केलेल्या शेतात आंब्याची दोन रोपं लावली. तो फळाची अपेक्षा करतही नाही. पण तो म्हणतो,"मालकानं जरी दुवा दिला नाही तरी त्याचा आत्मा तरी (दुवा) देईलच की."(पृ.९०) आत्मा हा राग द्वेषा षड्रिपू विर हित आहे. "आत्मा दुवा देतो त्यातून तुला काय मिळतं ?" याही प्रश्नाच उत्तर तशाच स्वरूपाचं आहे. 'माझ्या जिवाला शांती, आत्म्याला विरंगुळा; दुसरं काय हाय त्यात ? ही कुडी वाजवायच्या पव्यागत, देव फुकतोय तवर वाजायची, न्हाईतर सित्या कुत्र्यागत फुटून जायची" (पृ.९०) जीवनावर ज्याचं फार मोठे प्रेम, माया आहे अशा माणसाचीच परमसंतोषाची ही भावना आहे. त्याची पत्नी रखमामावशी जोगतीण आहे. लग्नाशिवाय ती त्याच्याजवळ राहते. शुक्रवारी गल्लीतली पाच घरं जोगवा मागते. (पृ. ८०) श्रध्दा आणि धर्मजीवन एकवटल्याचे हे सुंदर उदाहरण आहे. आयुष्यात ते दोघेही सुखी आहेत. समाधानी वाटतात. आला दिवस सुखाचा मानतात.

धर्मश्रध्दा, आणि नीती हे सर्व व्यक्तिजीवनाला, समाजजीवनाला गरजेचे आहेत. धर्म माणसाच्या मनात एवढया खोलवर रूजला आहे की त्यासंबंधी त्याची असणारी बुध्दी धारणा वैचारिक पातळीवर बदलणे खूप अवघड आहे. धर्माच्या अधिष्ठानामुळे आपली चिकित्सा आपण करू शकत नाही. धर्माला चिकित्सा मान्य नाही. भावबळाने - श्रध्देने या पारंपारिकतेला आपण जपत असतो आणि एक प्रकारचे आत्मिक समाधानही मिळ यत असतो. बाबजी बल्लाळ आणि मांगाचा लंगडा गोपा ही माणसं तशी समाधानीसुध्दा आहेत. त्यांचे धर्मजीवन प्रबळ आहे म्हणून तर पावित्र्याने व आत्मबळाने खूप काळ ती मनात रेंगाळत राहतात.

कुटुंबरचना -

कृषिकेंद्रित ग्रामीण संस्कृतीमध्ये कुटुंबसंस्थेला विशेष महत्त्व असते. शेती व्यवसायासाठी माणूसबळाची खरी गरज असते. म्हणजेच पर्यायाने विभक्त कुटुंबापेक्षा एकत्र कुटुंबाला जास्तच स्थैर्य प्राप्त होते. पेरणी, भांगलणी, मळणी अशी कामे करण्याच्या वेळी बाहेरचे शेतमजूरही रोजंदारीने सांगावे मागतात. महाराष्ट्रातली कुटुंबपध्दती पितृसत्ताक आहे. पुरूष-प्रधान संस्कृतीमध्ये पर्यायाने स्त्रियांना आणि मुलांना अर्थातच दुय्यम स्थान मिळते. ग्रामीण जीवनात विशेषत्वाने प्रचलित असलेल्या कुटुंबव्यवस्थेचे चित्रण प्रस्तुत पुस्तकात कशा प्रकारे येते ते पाहू.

भाडेकरू दत्तूमा, लंगडा गोपा, फुलाआत्ती यांना कौटुंबिक स्थैर्य आहे. खुळा इठू याला कौटुंबिक जीवन आहे पण मानसिक स्वास्थ्य नाही. फुलाआत्तीचा नवसाचा पोर - भिकू - कधीच घरी असत नाही. आक्कू - मावशीचा मुलगा केवळ रात्रीच घरी येतो. दिवसा कधीच तो घरी येत नाही. सतत त्याच्या खांद्यावर चकाकणारी कु-हाड असते. कधी कधी तो आईकडे दारू-जुगारासाठी पैसे मागतो आणि मारतोसुध्दा. स्त्री जीवनाची होणारी ससेहोलपट तिथे आक्कूमावशीबाबत दिसते. जगणेच कठीण अशी तिची अवस्था आहे.

एकाकीपणाचे जीवन जगणारी पात्रे -

गडी म्हादूमा म्हाकव्याचा आहे पण पोट भरण्यासाठी कागलात बागलाकडे राहिला आणि नंतर निवेदकाच्या घरी पोटावारी राहिला आहे. त्याच्या घराच्या आश्र्यानेच गडी म्हादूमा वाढतो, वावरतो आहे. एकाकीपणाचे जीवन असूनही त्याच्याकडे सोशिकता नाही. कोणावरही आणि कसाही उसळतो. सुखासाठी धडपडणारा म्हादूमा पोटावारी राहतो. दिन्या हा पोरकाच आहे. आई-वडील असूनही त्याला पोरकेपणा आला आहे. आपल्या कुटुंबाच्या संपर्काने तो जगतो आहे. एकलेपणाचे जाचक नियम त्याला मानवत नाहीत तेव्हा तो आई मंजा हिला सोडून आमच्या इथे परत येतो. मनमोकळेपणाने सारे सांगतो.

गडी म्हादूमाला स्नेहपाश कोणताच नाही पण दिन्या या स्नेह बंधात राहून आमच्या इथेच परत येतो. एकलेपणाचे दु:ख तसे नाही म्हणण्याइतपत तो समाधानी आहे.

शिवा, लंगडा गोपा, धोंडबा, दत्तूमा ही माणसं स्वतंत्रपणे जगताहेत. मुलं-बाळं यांच्या पसाऱ्यात दत्तूमा आणि गोपा वेळ दवडतात. बापू आपल्या कौटुंबिक जीवनाला चोरीतल्या मिळकतीचा आधार देतो आहे. भावसंबंधाने ती माणसं बांधली आहेत. धोंडबाच्या खादाडपणामुळे त्याची पत्नी हिरा उपाशी पोटीच मरून जाते. दादा म्हणजे वडील सदानकदा रागीट स्वभावाचेच दाखविले आहेत.

'मातीखालची माती' मधील स्त्री जीवन -

फुलाआत्ती संपूर्ण कुटुंबाचा भार उचलते. सहा नाती, मुलगा भिकू आणि सून यांचा खर्च चालविते. आक्कूमावशी पोटासाठी लाचार बनते. खुळ्या इठूची पत्नी, वहिनी बायना आणि आई ही पात्रे खूपशी समाधानी आहेत. शिवाची आई, 'भाडेकरू दत्तू' मधील निवेदकाची आई, 'दिन्या'

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

कथेतील 'मी' ची आई ही विविध ठिकाणी येणारे आईचे रूप गृहलक्ष्मीचे आहे.

विवाहबाह्य प्रेमसंबंध -

लग्नाशिवायही एकत्र राहून संसार करू पाहणाऱ्या स्त्री-पुरुषांची यशस्वी अथवा अयशस्वी कुटुंबचित्रे यादवांच्या या लेखनात आढळतात. स्त्री-पुरुषांच्या भिन्न जाती हे विवाहोत्तर संबंधाचे एक कारण असते. चव्हाणाचा आबामा गुऱ्हाळाच्या हंगामामध्ये गुळवेपणा करायचा. एकदा एका दूरच्या गावाहून . . बामणाची तरणी विधवा पोर त्याने नादी लावून आणली व तिच्याशी काही दिवस प्रपंच केला.

स्वत:कडे कमीपणा घेऊनही एखाद्या धनंतरबाईकडे राहणाऱ्या व्यक्तीचे चित्रण धोंडबा खादाड्या या व्यक्तिचित्रणामध्ये पहावयास मिळते. धोंडबा खादाड्याची बायको हिरा खंगून मेली. धोंडबाचा खूप मार खाऊन उपाशी पोटी मरून गेली. तिच्या मृत्यूनंतर दोन-तीन महिन्यांनी धोंडबा इठा मिसाळणीकडे जाऊन राहिला. या नटरंगी बाईचा नवरा पाच-सात वर्षांमागे वारला. तर धोंडबा तेथेच जाऊन राहिला दोन दुभत्या म्हशी, काळीभोर पिकाऊ जमीन खात आणि खंडीभर काम करीत तो तिथे राहिला.

जेवणा-खाण्यासाठी बायकोला मारणारा धोंडबा इठा मिसाळणीकडे लाचारपणाने राहतो.

समाज रचनेमध्ये कुटुंबाला विशेष महत्त्व आहे. कुटुंबाशिवाय समाज जीवनाला स्थैर्य येत नाही. सुस्थिर कुटुंबातील व्यक्तीच सामाजिक संकेत, रूढी पाळत असते. चव्हाणाचा आबामा वारला तेव्हा जेवण वाढण्याचे सोडून आई तिकडे आली. सुताराची राधी गरोदरपणात विहीरीत पडून मेली तेव्हा फुलाआत्ती प्रेताजवळ बसून टिपे गाळून आली. कौटुंबिक जीवनाशिवाय माणसाला स्थैर्य नाही.

आनंद यादव यांनी विविध स्वरूपाच्या कुटुंबजीवनाचे चित्रण केले आहे. एकाकी जीवन जगणारी माणसं, सुस्थिर कुटुंबातील माणसं, दारिद्र्याची पार्श्वभूमी असलेले कुटुंब जीवन याचे ब-याच बाजूने दर्शन घडविले आहे. ही विविधता दर्शविण्यात ते यशस्वी झालेत.

जातीनिहाय कामाची विभागणी -
------------------------

भारतीय समाजरचना ही जातीवर आधारलेली आहे, हे सर्वमान्य आहे. या समाजरचनेमुळे आपोआपच कामाची जातवार विभागणी होत गेली.

विशिष्ट जातीत जन्मलेली माणसे सामान्यत: परंपरेने चालत आलेले काम करीत असतात. मात्र यालाही अपवादात्मक व्यक्ती काही जातीत जन्मतात. यादव सरधोपटपणाने माणसांची चित्रे विशिष्ट जातीतील माणसातही मनुष्यस्वभावाला अनुसरून कशी विविधता असते याचे चित्रण करतात.

बापू आणि गोपा दोघेही मांग गडी आहेत पण दोघांच्या वर्तनात खूपच अंतर आहे. बापू अत्यंत निर्दयी, उपद्रवी आणि चोरटा आहे. बोक्याप्रमाणे तो सतत सावध आहे. मांगाचा पारंपारिक च-हाटा वळण्याचा व्यवसाय त्याने सोडला आहे. बिराप्पा धनगराचं कोकरू मारून पोट भरावं ही भावना होण्याइतपत तो निर्दयी झाला आहे. (पृ. ३९) उलट गोपा मांग खूपच प्रामाणिक आहे. दयाळू, प्रामाणिक आणि निरुपद्रवी आहे. नकली च-हाट बनविणे त्याला मान्य नाही. गरीबी असूनही त्याच्या राबण्यात एक प्रामाणिकपणा आहे. आपण खालच्या जातीचे आहोत याची त्याला जाणीव आहे. त्या वातावरणात वाढला असल्याने स्थीत लोकांना तो अजिबात दुखवत नाही. (पृ.१७१) समाधानी आणि प्रामाणिक आहे. ही दोन्ही माणसं एका जातीची असूनही वर्तणुकीत इतका फरक आहे.

इठू धनगर गडी दिवसभर मेंढरांचा बगा घेऊन रानोमाळ भटकतो. (पृ.१५८) कोकरू शोधायच्या निमित्तानं बि-या धनगर येतो. बि-याचं कोकरू बापूनं मारलेलं असते. (पृ. ३९) धनगर समाज पूर्वीपासूनच शेळ्या-मेंढ्या सांभाळण्याचा व्यवसाय करतो आहे. त्या इठूच्या घरातल्या बायका (आई, वहिनी, बायको- भिवरा) परंपरेनुसार भिंगरी - परट घेऊन सूत कातत असतात. (पृ.१६५) इतर ठिकाणी (धनगराशिवाय) असं चित्रण येत नाही.

म्युनिसिपालिटीचे महार गटारीतील घाण काढत होते. (पृ.१६३) म्युनिसिपालिटीच्या आरोग्य - सफाई विभागामध्ये बहुधा 'महार' काम-गारच असतात. दत्तू भाडेकराचा झिंगरा बैल मेला. तेव्हा मांग लोक तो 'डापीव' बैल नेतात... (पृ.११५) ढोरं ओढण्याची पारंपारिकता महार-मांग यांच्यात होती त्याचे हे चित्रण. बेल वाटणे हे गुरवाचे काम. गुरवाचा मुलगा तपस्विनी नानीला बेल देण्याचे काम अव्याहत बारा वर्षे करतो. (पृ.१४०)

कामाची ब-याच अर्थाने विभागणी झाल्याने खुल्या बाजाराची वस्तू विक्रीची स्पर्धा वगैरे नाही. शक्यतो एकमेकांच्या गरजा भागविणे ही सांधिकता जातीमागे आहे. त्या त्या जातीची कामाची विशिष्ट मक्तेदारी होती. गावगाड्यातून ही स्वतंत्र अशी काम करण्यासंबंधी पारंपारिक अशी बंधने असावीत. कामा-व्यवसायाच्या बाबतीत पारंपारिक-तेसोबत एक प्रकारची कलागुणयुक्तता दिसते. पूजेच्या वेळी मखर बांधणे, होमासाठी रांगोळी काढणे, बाशिंगे तयार करणे अशा वेळी गुरवाची कलाकुसर दिसून येते.

प्राणिसृष्टी-शेतकरी जीवनाचा एक भाग

शेतक-याच्या या व्यवसायामध्ये शेतीइतकेच प्राण्यांनाही महत्त्व आहे. बैलामुळे शेताची मशागत होते, खत मिळते वगैरे. डोंगराळ भागात

5273

A

वाहतुकीचे साधन म्हणूनही गाडी बैलाचा उपयोग होतो. शेतकरी गायी-बैलांना जपतो, धनगर शेळ्या-मेंढयांवरच उदरनिर्वाह करतो. कुंभार गाढवाला जपतो. दरवेशी वाघ-अस्वल सांभाळतो. आपलं जनावर धड तर आपण, आपला व्यवसाय धड अशी त्यांची सुस्पष्ट विचारसरणी असते. गाय-बैल, म्हैस-रेडा या प्राणिजीवनावरच शेतकऱ्याची मिळकत असते म्हणून तसा त्यांना मान आहे. दूध - दुभत्यासाठी गायी, म्हशींचा उपयोग करून घेतला. कोंबड्या सांभाळून काही प्रमाणात अन्नाची समस्या सोडविली. वगैरे बाबी सहजपणे पहावयास सापडतात. सदर 'मातीखालची माती' या व्यक्तिचित्रसंग्रहात शेतकरी आणि प्राणी यांच्या संबंधांचे चित्रण कोणत्या प्रकारे येते ते पाहू.

शेतकऱ्याचा खरा साथीदार बैलच आहे. आजच्या यंत्रयुगातही बैल असणाऱ्या शेतकऱ्याला थोडा इतराहूनही विशेष मान आहे. पेरणी आणि उसाची भरणी ही दोन्ही कामं बैलाशिवाय शक्यच नाहीत अशी आजही अवस्था आहे. शिवा आणि दिन्या यांच्या दैनंदिन कामकाजाकडे पाहिले तर बैलाशिवाय या व्यक्तिरेखा पूर्ण होतच नाहीत. पहाटे चांदणी उगवल्यापासून तो संपूर्ण दिवसभर आणि रात्री अपरात्री कधी कधी बैलांना वैरण टाकावी लागते. दत्तूचा चार माणसांचा प्रपंच गाडीभाड्यावरच चालू आहे. शेतकऱ्याच्या जगण्याला एक प्रकारचा भारदस्तपणा येतो तो बैलामुळेच. मशागतीशिवाय खत मिळते हा अनुषंगिक फायदा आहेच. शेतीला मशागत करावी लागते. तशीच खताचीही गरज असते. दुहेरी फायदे त्यातून होत राहतात.

कष्टकऱ्याच्या घरी बहुधा म्हैस असतेच. शेतीची कामं बारमाही असली तरीही मिळणारी वैरण उपयोगात आणून दूध-दुभत्याचा दुय्यम

व्यवसाय करण्यात येतो. स्त्रियांसाठी घर-बैठा हा जोडधंदा चांगला चालतो. दुभत्याची चंगळ असली की माणूस खाण्या-पिण्यासाठी वखवखच करीत नाही. त्याचा अधाशीपणा जवळजवळ नाहीसा होतो. धोंडबाच्या सास-यानं हौसेनं एक म्हैस लेकीला घेऊन दिली होती. काहीतरी तेला-मिठाला पैसा होईल ही त्याची भूमिका होती. पण सारंच दूध धोंडबाच्या घशातनं खाली उतरायचं.(पृ. १४५) चव्हाणाच्या गण्याची म्हैस नेहमीच दुस-याच्या पिकातून हिंडायची (पृ. ३४) तर त्याच पध्दतीची रतनापाची म्हैस दावं सुटून कवळा ऊस शेंडकत होती (पृ.९१ बाबजी बल्लाळ.) सायंकाळी शेतातून घरी परतताना दुभत्या म्हशीसाठी वैरण डोक्यावरन आणण्याची पध्दती शिवाकडे आहे. (पृ. ११) किनीट पडल्यावर शिवा आणि आन्दा म्हशीसाठी वैरण घराकडे आणतात.(पृ. ४८) दुभत्यासाठी हा सारा आटापिटा चालतो हे स्पष्ट आहे.

कुत्रा हा इमानी प्राणी म्हणूनच त्याची त्यादृष्टीने किंमतही जास्त आहे. इठू धनगराकडे वाघ्या कुत्रा आहे. तो जर्मनीच्या पांढ-या भगोण्यात मेंढीच्या दुधात भाकरी कालवून घालतो. (पृ.१५८) इतकी त्याची माया त्या वाघ्या झिप-या कुत्र्यावर आहे. त्याच्या एकाकी मनोवृत्तीतला कुत्राच त्याचा खरा साथीदार आहे.

बाबजी बल्लाळा कडे दोन-तीन तरी कुत्री असतात. कुत्र्यांना दिवसातनं दोन वक्ताला झाकणी- झाकणीभर जुंधळ्याच्या कण्या नि ताक चारतोय. सित्या कुत्र्यावर त्याची खूप मर्जी होती. पोटच्या मुलाप्रमाणे तो जपतो. त्याच्या मरणाने खूप दु:खी होतो. (पृ. ८९) निवेदकाच्या मळ्यात असलेला चव्हाणाचा आबामा मोटच्या जुंपण्या समजून राजा कुत्र्याला धरतो. (पृ.२१) एखाद्या माणसाला नाव असावे तशा पध्दतीने येथे कुत्र्यानाही 'सित्या','वाघ्या','राजा' अशी नावे आहेत. यावरून जवळीक दिसते.

इठू धनगराचा पिढीजात व्यवसाय असल्याने या प्राण्याशी त्याचा लळा आहे. (पृ.१५८) बाबजी बल्लाळकडे शेळ्या-कोकरं आहेत. मुक्या जनावरांना माया दिली तर ती निरागस पोराप्रमाणे निर्मळ वागतात अशी त्याची धारणा आहे.(पृ. ९१) एका खणाइतक्या जागेत चार माणसासोबत दत्तूमाच्या इथे एक शेरडू सुध्दा राहते. माणसाइतकीच त्याची किंमत येथे करण्यात आली आहे. (पृ. १०६) परिस्थितीमुळेच माणूस प्राण्याशी नाइलाजाने निर्दयपणे वागतो. बापू मांगानं कोकरू ठार मारून तात्पुरती उपासमार थांबविली.

शेतकऱ्याच्या जीवनात कृषिउद्योगाला उपयुक्त अशा प्राण्यांना अटळ प्रकारे स्थान असते. मात्र शेतकरी प्राण्यांकडे केवळ उपयुक्ततेच्या दृष्टीने पाहात नाही. प्राण्यांना त्याच्या भावजीवनात स्थान मिळते. ते त्याच्या कुटुंबाचा भाग बनतात. यादवांच्या या व्यक्तिचित्रसंग्रहात काही प्रमाणात याचे चित्रण आलेले आहे. हे चित्रण विपुल प्रमाणात मात्र नाही. कारण सगळ्याच चित्रित व्यक्ती शेती व्यवसायाशी संबंधित नाहीत.

व्यक्तिमनाचे चित्रण -

श्री.आनंद यादव यांनी लिहिलेल्या व्यक्तिचित्रांचे लेखन १९५५ ते १९५८ या कालावधीत झालेले आहे. या व्यक्तिचित्रांची निर्मिती होण्यामागील कारणमीमांसा करताना आनंद यादव म्हणतात," व्यंकटेश माडगूळकर यांची माणदेशी माणसं बी.ए. ला आल्यावर वाचून काढली (१९५५ ते १९५८ बी.ए.) त्याचा परिणाम असा झाला की आपल्याही गावाकडली माणसं आपण रेखाटावीत या हेतूनं मी बी.ए. मध्ये असतानाच (१९५५-५८) लिहिली होती."[४] माडगूळकरांच्या कथा पाहिल्यावरच त्यांना लेखनाची अशी प्रेरणा झाली यामुळेही या व्यक्तिचित्रांचे वैशिष्टयं

काही प्रमाणात प्रकट होते·

व्यंकटेश माडगूळकर यांची 'माणदेशमधील माणसं' वाचकाच्या मनात फार काळ रेंगाळत राहतात· बेरकी 'सिदा चांभार', बायकोपेक्षा अस्वलाला जास्त किंमत देणारा 'बाबाखान दरवेशी,' हेकट स्वभावाचा 'माझा बाप' (तेली), लावणीच्या ओढीमुळे तमाशात जाणारा मांग 'नामा मास्तर', मग्रूर 'कोंडिबा गायकवाड,' 'जालंदर एकनाथ लोहार उर्फ झेल्या' ही सर्वच माणसं सहजतेने वाचकाच्या जवळ पोहोचतात. जुना स्नेही खूप दिवसांनी भेटावा, त्याने आपले सारे मन रिते करावे, सुख-दु:खाच्या गोष्टी मोकळेपणाने सांगाव्यात अशी माणदेशी माणसं आजही (१९८६ मध्ये-सुद्दा) वाचकांना मोहवितात· आज साहित्याचे क्षेत्र विस्ताराने नवे विषय आले पण या सदतीस (१९४९-१९८६=३७) वर्षानंतरही त्यामध्ये शिळेपणा आला नाही हे महत्त्वाचे आहे· ग्रामीण साहित्याच्या प्रारंभीच इतकी उंच साहित्यकृती निर्माण व्हावी आणि त्यामुळे आनंद यादव भारावले जावेत हे स्वाभाविक वाटते·

व्यक्तिचित्रणाची वैशिष्टये -

आनंद यादव यांच्या 'मातीखालची माती' मधील व्यक्तिचित्रणात विविधता आहे· बहुसंख्य पात्रे दारिद्र्याने गांजलेली, अन्नाला वखवखलेली आणि अन्न मिळविण्यासाठी काहीही करायला तयार असणारी अशी आहेत· उदा· शिवा, आक्कूमावशी, धोंडबा, गोपा तर काही वैशिष्टयपूर्ण व्यक्तिमत्त्व असलेली अशी आहेत· पुत्रप्रेमाला व्यापक स्वरूप देणारा 'बाळजी बल्लाळ', निसर्गानेच शाप दिलेला स्त्री अगर पुरुष नसलेला 'सखाराम' आहे· मात्र ही सगळीच व्यक्तिचित्रे प्रत्ययकारी स्वरूपात चित्रित केली आहेत·

मातीखालची माती या व्यक्तिचित्रणामध्ये सजीवता आली आहे· ती कोणकोणत्या गुणवैशिष्टयामुळे आली आहे ते पाहणे योग्य होणार आहे·

माडगूळकरांच्या 'माणदेशी माणसं' पासून प्रेरणा होऊन 'मातीखालची माती' हा व्यक्तिचित्रसंग्रह लिहिला. या संदर्भात यादव म्हणतात, "माडगूळकरांच्या कथेने अनुभवाकडे कलात्मक अलिप्ततेने पहायला शिकविले ... साहित्यात व्यक्त होणाऱ्या अनुभवातील पात्रावर आणि प्रसंगावर आपली दृष्टी लादायची नाही... आपणास आलेल्या समाजातील अनुभवांचं, पात्र प्रसंगांचं अलिप्तपणानं जे काही आकलन झालं असेल ते वस्तुनिष्ठ मांडायाचं ही दृष्टी माडगूळकरांनी कथेला दिली."[5]

व्यक्तिचित्र सजीव होण्यासाठी त्या पात्राचे वर्तन व त्याच्या मनातील भाव-आंदोलने दाखविण्यासाठी प्रत्ययकारी शब्द योजना करावी लागते. वलाख-बेरकी लोहार झेल्या (माणदेशी माणसं) जसा ध्यानी राहतो, मिशीवर पालथी मूठ फिरविणारा कोंडिबा गायकवाड ध्यानी राहतो तसाच रघू कारकून (माणदेशी माणसं) ही ध्यानी राहतो तशाच पध्दतीने यादवांचे बापू, दिन्या, शिवा, वव्हाणाचा आबामा, गडी म्हादूमा, फुलाअत्ती ध्यानी राहतात का ? याची सूक्ष्मतर चिकित्सा करावयाची आहे.

संवादी घटनाचित्रणामधून प्रत्ययकारिता -

शिवा लक्षात राहतो तो भुकेने वखवखलेला - दबलेला जीव म्हणून. दादांच्या शिव्या पोटभर खाऊन तो कनकवळ्यासारखा झाला आहे. शेतीची कामं करणे आणि दादांच्या शिव्यासाठी जन्मलेला शिवा कूप लावताना पायात पळकीचा कुजका काटा मोडल्याने महिनाभर घरी राहतो. तेवढाच त्याला विसावा होतो. त्याचे मन सदैव दबलेले आहे. मारक्या बाळ्या बैलापुढे बसविल्यासारखं नेहमीच तो भुकेने बावरला आहे. भूक बलवत्तर आहे. गुळाचा चहा पितो. मोठ्या भावाला कोकणातून परत येताना चार पोती भात आणण्याविषयी सांगतो. त्याच्या चिडक्या, रडवेल्या बोलातून त्याचा स्वभाव आणि अधाशीपणा प्रत्ययाला आणण्यात यादव यशस्वी झाले आहेत.

पहिलवानकी करणारा चव्हाणाचा आबामा शेवटी अपचन होऊन वारला. 'काळ हा कोणासाठी थांबत नाही.' हे दर्शविण्यासाठी शेवटचे वाक्य विशेष ध्यानी राहते. 'एक कुत्रं गोरीला हुंगत होतं. गोरीवरच्या दगडावर तंगडी वर करून मुतत होतं.'(पृ.२७)

'पावसाळ्यात बापू हया तसरीला कालवा उसकून देतो' (पृ. २९) या एकाच वाक्यातून बापू हा खटपटया, भानगडीबाज आहे हे ध्यानी येते. खूप बडबडी, फटकळ आणि केवळ शिव्यांचाच वर्षाव करणारी फुला-आत्ती बोलता-बोलता, शिव्या देता देता कामावरच राग काढते. कवितेचे ध्रुपद असावं तशी शिव्यांची मांडणी आहे. "साठ-पासष्ट वर्षाची फुलाआत्ती नव्या बैलगाडीसारखी अजून खडखडीत आहे. (पृ. १००) इतके बडबडूनही तिचं तोंड फुटत नाही. पाठाच्या सुरुवातीचीचे वाक्य आहे. "फुला-आत्तीचं तोंड लोखंडाचं आहे."(पृ.९३) प्रत्ययकारितेचे हे चांगले उदाहरण आहे. हीच फुलाआत्ती सुनेला मुलगा झाल्यावर सुनेला मिठी मारून घळघळा रडली.(पृ. १०२) बाहेरून काटेरी आणि अंतरंगातून मायाळू अशी फुलाआत्ती मनात रेंगाळते. आक्कू मावशी मोग्याचं बोळं घट्ट करून घालत उंब-यात बसते (पृ. ४६) तडे गेलेली गाडगी, ढासळलेल्या भिंती त्याच प्रमाणे त्याच घरात आडदाणीवर फाटक्या वाकळा, धोतरं लोंबत होती. अशा घरात अंधरात भूत बसल्यागत बसायची. हे सगळे वर्णन वाचल्यावर मनासमोर जे चित्र तयार होते त्यात प्रश्न निर्माण होतो की, ही आक्कू मावशी का जगते ?"

धोंडबा खादाडपणाविषयी प्रसिद्द आहे. त्याचा भाऊ गणा त्याचा उल्लेख करताना 'रेडा' शब्द वापरतो.(पृ. १४३) धोंडबाच्या ताकतीचे दर्शन घडविणा-या अनेक घटना आल्या आहेत. मोटेनं पाणी ओढून आंघोळ करणे, खताची भरलेली गाडी कासराभर ओढणं, जोंधळ्याचं मणाचं पोतं कवळ्यानं उचलून ठेवणं, सापाच्या डोक्यावर पायताणाचा पाय ठेवून साप मारणं या विविधतेतून त्याच्या अफाट ताकतीचा प्रत्यय देतो.

विशेष म्हणजे संतरामच्या गोठ्यात साप निघाला म्हणून जाताना वाटेत बेडकी फुटते ती घटना खूप सूचक आहे. "चिर्रर दिशी आवाज येवून फटकन् वाजलं. ढबूणी मिरची फुटावी तशी एक बेडकी धोंडबाच्या पायाखाली फुटली..."(पृ. १५१) अल्पशा शब्दात चित्र निर्माण करण्याची किमया दिसून येते.

'गोपाचं शेत ओसाड पडतं... गोपाच्या नशिबागत'(पृ.१७१) गोपाचं आयुष्य, त्याची शेती आणि निसर्गाची साथ आर्थिक परिस्थिती सर्वांचेच साकल्याने दर्शन होते.

दादा मुळचे जरा रागीटच होते. मोटेचं पाणी-गडी म्हादूमा नीट ऐकूनही घेत नाही. पाणी पाजलेल्या चि-यातच पुन्हा पाणी जायचं हे पाहून"दादांचा राग रसाच्या काईलीगत आतल्या आत उसळायचा." (पृ. ६०) रागाचे वेळी होणारा भावनोद्रेक आवरताना काय स्थिती होत असेल याची दृश्यात्मकता जाणवते.

परस्पर विरोधात्म चित्रणातून प्रत्ययकारिता -

दोन परस्पर विरोधी घटना दर्शवून त्याद्वारे व्यक्तिचित्र रेखाटण्याची पध्दती काही व्यक्तिचित्रांमध्ये दिसते. "हं ! ये म्हातारे, पोरीच्या तोंडात साखर घाल; ये." या वाक्याने 'आक्कू मावशी' या व्यक्तिचित्राला सुरुवात होते पण त्याच व्यक्तिचित्राच्या शेवटी येशेल तेलाचं ठावकं विझवून ठेवणारी, लुबरा पोटासाठी धडपडणारी आक्कू — मावशी, कोंबडीचं पिल्लू धरण्यासाठी धडपडणारी आक्कू हे अगदी टोकाचं विरोधाभासाचं उदाहरण आहे. साखर खाणारी आनंदी असणारी मावशी पोटासाठी ओवाळून टाकलेलं कोंबडीचं पिल्लू व तेल घेण्याचा प्रयत्न करते. जुणेरात पोळ्या आणि अंडं तर घेतलंच होतं. या विधानातून दोन विभिन्न घटकातून अंतर्यामी एक धागा दर्शविला आहे."सखाराम झकासपैकी लुगडं नेसतो." (६७)

"इठू धनगर असूनही पायात पायताण नाही." (पृ.१५८) "गोपा मांग असला तरी निरुपद्रवी आहे." (पृ. १७८) ही वाक्ये सहजासहजी अंतरंग उलगडतात. स्वभाव-गुणधर्म दर्शविसात. व्यक्ती आणि पेशा यात विसंगती आहे हेच त्यांचं वैशिष्टय आहे. धोंडबाची बायको हिरा हिनं धोंडबाला चुकवून दुधाची कासांडी हंड्यात ठेवली. धोंडबा कासांडी रिकामी करतो. हिराचा चोरबाजार उघडकीला येतो. तिचं मनच तिला खातं त्यावेळचा प्रसंग चित्रित करताना,

"साखरेचा खडा म्हणून तोंडात सल्पेट टाकावं तसं हिराचं तोंड झालं." (पृ. १४६) हे वाक्य वापरलं आहे. हिराच्या मनात उमटणाऱ्या भावनांना शब्दबद्द करता येणे अवघड आहे. झाकून ठेवलेली कासांडी रिकामी होताना तिची मन:स्थिती कशी असेल, याचे शब्दांकन होते. "इठूचे डोळे गरीब मेंढीगत, कान लांडग्यासारखे उभट रुंद आहेत." (पृ.१५७) इठूचा स्वभाव त्यातून समजतो. विरोधी बाजू सांगून त्यातून मनाचे कंगोरे दाखविले आहेत.

अंतर्मनाचे चित्रण -

"कथाकाराचे खरे कार्य म्हणजे हृदयाच्या पडद्याआड चाललेले मानवाचे मूक जीवनचित्रण करणे हे आहे. हृदयातले अनेक तरंग बाहय जगात व्यक्त करता येत नाहीत. ते कथाकाराच्या (साहित्यिकाच्या) कलेमुळे आपल्यापुढे मूर्तीमंत उभे राहतात[१६] असे वि.स.खांडेकरांनी फ्रेंच टीकाकाराचे मत सांगितले आहे. या उक्तीचा, विचाराचा आधार घेऊन जर विश्लेषण करावयाचे झाल्यास मनाच्या स्थितीशील स्वभावाचे तीन टप्पे असतात, ते म्हणजे

जागृत मन

अर्ध-जागृत मन व

सुप्त मन

या पैकी जागृत मनाच्या अवस्थेत असताना माणूस आपल्या मनाचे कंगोरे, मनातले

विचार झाकून ठेवतो. त्यासंबंधाने तो बोलत नाही. जाणीवपूर्वक काही भाव लपवून ठेवतो.

सुप्त मनाच्या अवस्थेत ते शांतच असते पण अर्ध जागृत अवस्थेत भास होणे, स्वप्न पडणे, झोपेतून जागे न होताच चालत जाणे वगैरे गोष्टी घडतात. दबलेल्या मनाचा तेथे सहजोद्रेक होतो. त्या स्वरूपाचा, मानसिक अवस्थेचा वापर येथल्या काही कथामध्ये करण्यात आला आहे. त्यादृष्टीने विचार करावयाचा आहे.

व्यक्तीच्या अंतरंगात प्रवेश करण्यासाठी यादव स्वप्नाचा उपयोग करतात. अतृप्त इच्छांची तृप्ती हे स्वप्नाचे वैशिष्टय असते. अशा अतृप्त मनाची वासना - ओढ त्यांनी काही व्यक्तिचित्रात दाखविली आहे.

अफाट खाणं, अचाट काम करणं, धाडसानं काम करून दाखविणे असं धोंडबाचं मन त्याला नेहमी प्रेरणा देत असतं. सर्वस्थळी, सर्ववेळी अशीच संधी तो साधण्याचा त्यारीत असतो. ग्-हाळात उसाच्या वाकु--यात गारव्यात त्याला सुस्ती येते. दुपारीच डोळा लागतो. स्वप्न पडतं. त्या स्वप्नातल्या तमाशात तो भिमाचं काम करतो. बकासुरा-कडे अन्नाचा गाडा नेतानाच भूक लागली. गाड्यावर बसूनच भाताचा हंडा खायाच लागतो. (पृ. १५३) "पोटभर अन्न खाणं" या घटनेची तो स्वत:ही पूर्ती करतो. ध्यानी मनी-रात्रंदिनी एकच ध्यास त्याचा आहे. खूप खायचं ! खूप खायचं !! खूप खायचं !!! ?

पुरूष सखारामाच्या भावना स्त्रीच्या आहेत. बापयाच्या मिठीत राहण्यात त्याला सुख वाटत राहत. यल्लम्माच्या डोंगरावर झाडाखाली सखाराम झोपला असताना स्वप्न पडतं. "स्वप्नांत सुंदरपैकी लुगडं नेसलं आहे... त्याला बाईचे रूप आलं... झोपेतून तो जागा झाला सर्व अंग चाचपून पाहिलं... पण शेवटी निराश झाला." (पृ. ७७)

आई-वडिलांच्या स्वप्नात यल्लूबाई आली त्याच घटनेचा संस्कार त्यावर झाला आहे· पुरुष आणि स्त्री यांची संमिश्र जाणीव त्याच्याकडे आहे· 'पुरुषाचं वागणं बाईसारखं·' अशी त्याची द्विधा अवस्था झाली आहे म्हणूनच त्याला स्वप्नातही उत्तर मिळू शकत नाही·

वेडाच्या लहरीत माणसाचे जागृत मन काम करीत नसते तर अर्ध-जागृत मन कार्यरत असते· अशा अर्धजागृत मनाचे चित्रण करून कोणत्या आघाताने माणूस खुळा झाला होता हे 'खुळा इठू' या व्यक्तिचित्रात यादवांनी उत्तम प्रकारे दाखविले आहे·

पाच वर्षापूर्वी इठूचं लग्न झालं· पहिली तीन वर्षे मूलही नव्हतं· पुढं बायकोचं आणि त्याच पटेना· शेवटी मुलगा झाला आणि इठू खुळा झाला· बायको भिवरा ही व्यभिचारी आहे, म्हणून तो मुलगाही आपला नाही अशी त्याची धारणा झाली आहे· त्याच्या वेडेपणातही एक क्रमबद्द विकास आहे· आज मुलगा दीड वर्षाचा आहे· तरीही बायकोशी त्याचं पटत नाही· वेडाची लहर आली की त्याची व्यथा आपणाला समजते· त्यावेळी तो म्हणतो,

"··· भाऊ तिकाऽऽड धिन् ! ··· पाऊस हाय आभाळाचा, धरती हाय लोकांची····वाऱ्याच्या नादाला लागतोय नि धरतीत मुततोय··· कुणाच्या पोटात कुणाचं बी ? कोण हाय कुणाचं···"(पृ·१५९) त्याच्या मनातला सूक्ष्म भाव प्रगटला आहे· बाजारपेठेतून मुरडत चाल-णाऱ्या तरण्या बाईला इठू म्हणतो, " ··· गाव भुलवत बसशील हितं नि न्हवऱ्याच्या फुड्यात उस्टी इस्तारी मांडशील ··· सरळ चाल की· किती मुरडशील ? " (पृ· १६१) लक्ष्या हमालाला त्याच्या लग्नात बोह-ल्यावर सांगतो, "··· बायकाची जात चुकारीच्या मेंढीगत असती· डोळा ठेव··· "(पृ·१६२) पराकोटीची अवस्था म्हणजे पोर शिवण्याला दोन अडीच मैलावरील डोंगरातल्या लक्ष्मीच्या देवळात ठेवून येतो· शिर्पतीमानं

विचारल्यावर म्हणतो, माझ्या पोटाला कुठं पॉर हाय आणि ? " (पृ. १६७) पाण्यातला चुना उतू आल्यागत वेडाचा उमळ यायचा..... संसार कुणाचा ? बायकू कुणाची ? पॉर कुणाचं ?... झुक झुकाऽ क झ्याऽ क ! कोण हाय कुणाचं ? आरं वाऽ ला ! " (पृ. १६९)

विठूच्या सुप्त मनाचा विशेष अभ्यास करावा अशी बाब आहे. मनातील भाव जो जो दाबून ठेवावेत तो तो त्यांचा उद्रेक जास्त होत राहतो. इठूच्या अंतर्मनाचा वाचकाला प्रत्यय येतो. सहन करण्याची क्षमता संपली की माणूस विचित्र स्वरूपाने विचार करायला लागतो. त्यातूनच वेड लागते सामान्य स्वरूपाचे वागणे संपून मनमानेल असे वर्तन सुरू होते. विठू हा त्या स्वरूपाचा माणूस आहे. त्या वेडामागे त्याची अशी एक विचारसरणी आहे. त्याचा मानसशास्त्रीय दृष्टीने अभ्यास करता येतो. दबलेल्या मनाचा त्या दृष्टीने, वेडाच्या भरात बडबडल्याने थोडा बहुत निचरा होतो.

व्यंकटेश माडगूळकर यांचा प्रभाव -

'माणदेशी माणसं' आणि 'गावाकडच्या गोष्टी' व्यंकटेश माडगूळकरांच्या साहित्यकृती अनुक्रमे १९४९ आणि १९५१ मध्ये अवतरल्या. संपूर्ण माणदेश मराठीमध्ये शब्दरूपाने अजरामर केला. १९५५ च्या दरम्यान 'माणदेशी माणसं' वाचून आपणही तसंच पण आपल्या भागाचं शब्दचित्रण करावे असे आनंद यादवांना वाटले आणि त्या प्रेरणेतूनच 'मातीखालची माती' (लेखन काळ १९५५-५८) साकार झाली.

"मराठी कथा प्रकाराला माडगूळकरांनी नवे रूप दिले या सर्व बाबींचा परिणाम आपणावर झाला आहे;" असे आनंद यादव सांगतात.[७] "माडगूळकरांच्या कथेनं वस्तुनिष्ठ दृष्टी दिली".[८] झेल्याची चाणाक्ष दृष्टी दप्तराच्या फडक्याची आणि एका विद्यार्थ्याच्या सदऱ्याची गाठ मारण्यात

आहे. कृतीतून ते दर्शविले आहे. तीच अवस्था 'शिवाची' मानता येते. चहा, भात, वगैरे भरपूर मिळत नाही म्हणून बहिणीला दोन धपाटे घालतो.

बरेच दिवस दूध, लोणी हाती लागलं नाही म्हणून धोंडबाची दशा उपाशी पडलेल्या कोल्ह्यागत झाली होती. डिवचलेल्या कोंडिबा गायकवाडाची मनोभूमिका येथे अशा चिडक्या स्वरूपात संक्रमित झाली नाही ना ? अशी शंका येते.

नामा मास्तर (माणदेशी माणसं) मांगाचा आहे. तशी येथे दोन पात्रे 'बापू', 'लंगडा गोपा' मांगाची आहेत. बन्याबापूचा खानदानी-पणा 'तपस्विनीत' प्रतिबिंबीत आहे. 'गणा भपट्या' मध्ये अनेक घटना एकाच उद्दिष्टासाठी सांगितल्या तशा येथे 'धोंडबाच्या खादाडपणा'विषयी अनेक घटना सांगितल्या आहेत. फुलाआत्ती शिव्या देण्याविषयी प्रसिध्द आहे. 'गरीबी' मध्ये हा भाग "माणदेशी माणसं" आणि "मातीखालची माती" या दोन्हीमध्ये समान गुणधर्माने आला आहे.

व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'माणदेशी माणसां'पासून साहित्यिक प्रेरणा घेऊन आनंद यादव यांनी 'मातीखालची माती' मधील व्यक्तिचित्रे रेखाटली. माडगूळकरांच्या माणदेशी माणसांचा एवढा मोठा प्रभाव पडला की, तशीच पात्रे अंतर्बाह्य वर्तनासह रेखाटावीशी वाटली. मनोव्यापारा-सोबत शारीरिक ठेवण, हालचाली, वर्तनपध्दतीचे वर्णन आले की त्या व्यक्तिचित्राला पूर्णता येते ही गोष्ट माडगूळकरांकडून सहजपणे घडून गेली तसाच प्रयत्न पुढे यादवांनी केला आहे.

माडगूळकरांच्या भुलाण्याच्या बकसला दोन्ही हात काखेत दाबून उभा राहण्याची सवय आहे. सदऱ्याला गुंड्या नसलेला, चड्डीच्या खिशात चिंचाचे ओझे वागवीत, इतर सहकाऱ्यांना गुरकावणारा झेल्या विलक्षण दृष्यात्म बनला आहे. भिंतीवर पालथी मूठ फिरवीत मगुरीने जगणारा

कोंडिबा गायकवाड गाडीच्या जुवासारख्या रुंद खांधाचा आहे. पात्रे दृष्टीगोचर करण्यामध्ये शारीरिक वर्णनाचीही आवश्यकता असते.

आनंद यादवांच्या 'मातीखालची माती' मध्ये असे दृश्यात्मकतेचे धागे मिळतात. दिन्याचं वर्णन करताना 'चिखल थापून शिराळशेटचं अंग घडवतात तसं काळं, ओबड धोबड अंग आणि नाकापाशी चिखलाचा मुकटा चिकटविल्यागत' अशी शब्दरचना केली आहे. धोंडबाची शरीरसंपदा सांगताना तौलनिकता उपयोगात आणली आहे. 'गणा थोरला, तरी वाळलेल्या शेवग्याच्या शेंगगत आणि धोंडबा धाकटा असून मोठमोठी कलिंगडी, भोपळं, फुटवाळकं एकाजागी करून बांधाल्यागत दांडगा' या वर्णनातून धोंडबाची धिप्पाड शरीरयष्टी दृग्गोचर होते. 'आक्कूमावशीच्या गोऱ्यापान अंगावर काळ्या तिळांचे खूप डाग आहेत. केसांच्या आखूड बटा कानावरनं डोळ्यावरनं लोंबत होत्या,' यादवांची ही सार्थ शब्दरचना पात्रांचे रूप दर्शविते. अगदी माडगूळकरांइतकी प्रत्ययकारी चित्रणे नसली तरी त्यांच्या जवळपास जाण्याचा काही प्रमाणामध्ये यशस्वी प्रयत्न आनंद यादवांनी 'मातीखालीची माती' या संग्रहामध्ये केला आहे, हे खरे आहे.

## सारांश -

आनंद यादवांची 'मातीखालची माती' म्हणजे पहिले गद्य कथात्मक स्वरूपाचे लेखन आहे. व्यंकटेश माडगूळकरांची 'माणदेशी माणसं' वाचून अशाप्रकारची व्यक्तिचित्रे आपणही लिहावी अशी प्रेरणा आनंद यादवांना झाली. स्वाभाविकपणेच व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रलेखनाची काही वैशिष्टये यादवांच्या प्रारंभिक लेखनामध्ये दिसून येतात. व्यंकटेश माडगूळकर आपल्या लेखनातून ग्रामीण सामाजिकतेचे चित्रण विपुल प्रमाणात करतात. त्यांचा भर सामाजिक स्वरूपाच्या चित्रणावर तसेच व्यक्तीच्या

कृतींचे चित्रण करण्यावर असतो· माणसांच्या कृतीच्या द्वारे त्यांच्या मनाचे दर्शन घडविणे ही माडगूळकरांची लेखन-पद्धती आहे· माणसांच्या अंतरंगाचे विस्ताराने पापुद्रे उकलून दाखवावेत ही माडगूळकरांची पद्धती नाही· आनंद यादवांच्या या पहिल्या कथात्मक स्वरूपाच्या लेखनात माडगूळकरांच्या लेखन वैशिष्टयाचा प्रभाव अधिक प्रमाणात जाणवतो असे म्हणता येईल· त्यादृष्टीनेच यादवांच्या या व्यक्तिचित्रणात सामाजिकतेचे चित्रण कसे केलेले आहे व मनाचे चित्रण कितपत आले आहे याचा विचार केला आहे·

`मातीखालची माती' यामध्ये चित्रित झालेली समाजजीवनाची विविध अंगे विचारात घेताना प्रथमत: शेती या व्यवसायाचे व काम करणा-या शेतक-याचे चित्रण यादवांनी कसे केले आहे ते विचारात घेतले प्रस्तुत संग्रहात शेतक-यापेक्षा शेतमजूराचे चित्रण अधिक प्रमाणात येते· ग्रामीण मनुष्य शेतीशी निगडीत असणारी कोणकोणती विविध कामे करीत जगतो याचे चित्रण यादवांनी चांगल्या प्रकारे केले आहे· त्याच्या जोडीनेच शेतक-याचा प्राण्यावर कसा जीव असतो, बलुतेदाराचे काही वर्तन असते· याचेही चित्रण लेखकाने केले आहे· या ग्रामीण परिसरात पोटाची भूक माणसाला सदैव व्याकुळ कशी करते· याचे वर्णन अनेक व्यक्तिचित्रामध्ये आहे· स्वाभाविकपणेच माणसाला पोटाची भूक भागविण्यासाठी चोरी करावी लागते· याचेही चित्रण यादवांनी आपल्या व्यक्तिचित्रात केले आहे· ग्रामीण परिसरामध्ये कौटुंबिक जीवन कशा स्वरूपाचे आहे याचे विविध स्वरूपी चित्रण या व्यक्तिचित्रात केले आहे· काही सुस्थिर कुटुंबातली माणसं आहेत· काहींच्या कुटुंबातील सुस्थिरतेला तडा जातो· व ते विवाहबाहय संबंध ठेवतात· तर काही माणसं एकाकी जीवन जगणारी आहेत· भारतीय समाजव्यवस्था ही जातीवर आधारलेली आहे· या व्यक्तिचित्रसंग्रहामध्ये जाती-जातीमधील संबंधाचे फारसे चित्रण येत नसले तरी महार, गुरव इ·जातीतील माणसे पारंपारिक पद्धतीची कामे कशी करतात याचे उल्लेख येतात·

व्यंकटेश माडगूळकरांप्रमाणे काही व्यक्तिचित्रणाबाबतीत ते वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या घटनेचे व त्या पात्राच्या उक्तीचे चित्रण करतात. मात्र आनंद यादव व्यक्तिमनाचे चित्रण करताना केवळ कृतीच्या द्वारा व्यक्तिमनाचे चित्रण करण्यावर ते संतुष्ट रहात नाहीत तर व्यक्तीच्या अंतरंगात प्रवेश करण्यासाठी स्वप्नाचा उपयोग करतात. अतृप्त इच्छांची तृप्ती हे स्वप्नाचे वैशिष्ट्य असते. अशा अतृप्त मनाची वासना ओढ त्यांनी काही व्यक्तिचित्रात दाखविली आहेत. संवादी स्वरूपाच्या आणि विरोधात्म स्वरूपाच्या चित्रणाच्या सहाय्याने यादव आपली व्यक्तिचित्रे प्रत्ययकारी करतात.

ग्रामीण भागातील सामाजिक वास्तव, तेथील दारिद्र्यात सोशिकपणाने राहणारी माणसे यांचे चित्रण यादवांनी केले आहे. त्यांच्या या पहिल्या पुस्तकावर व्यंकटेश माडगूळकरांच्या व्यक्तिचित्रलेखनाचा प्रभाव विशेषत्वाने पडलेला आहे. हे त्यातील विषय आणि व्यक्तिचित्रणपध्दती यांच्या द्वारा जाणवते.

संदर्भ

१. अनुराधा पोतदार, 'मळ्याची माती', मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, १९७८, पृ.११

२. गो.मा.पवार, 'प्रतिष्ठान', औरंगाबाद, मे १९६८, वर्ष १६, अंक ९, पृ. ३ ते १४

३. दुर्गा भागवत, 'धर्म आणि लोकसाहित्य', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई १९७५, पृ. १

४. आनंद यादव, 'मराठी ग्रामीण कथा आणि खळाळ:काही प्रश्न' खळाळ:एक मुलाखत, मुलाखतकार प्रा.द.ता.भोसले पृ.१८६.

५. आनंद यादव, 'खळाळ एक मुलाखत', पृ.१९२.

६. संपा.खांडेकर वि.स., 'पाच कथाकार', कॉन्टिनेन्टल प्रकाशनपुणे, ३०, चवथी आवृत्ती, १९६४, प्रस्तावना, पृ.४७.

७. आनंद यादव, 'खळाळ एक मुलाखत', पृ.१८७.

८. आनंद यादव, 'खळाळ एक मुलाखत', पृ.१९२.